महासागर
e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

## विशेष मोहीमेमध्ये ३६ गुन्हयांसह ५ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**बुलढाणा (जिमाका)** : राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत १० व ११ जुन २०२५ रोजी संपुर्ण जिल्हयात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेमध्ये एकुण ३६ गुन्हयांची नोंद करण्यात आलेली असुन ३६ आरोपींसह हातभट्टी ३७१ लि. रसायन ८३५७ लि. देशी मद्य ११७.७२ लि. व विदेशी मद्य ३५.८२ लि. यासह एकुण ५ लक्ष ९८ हजार ७०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले.

आयुक्त,रा.ऊ.शु.म.रा.मुंबई डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, अधीक्षक, रा.ऊ. शु. बुलढाणा डॉ. पराग नवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हात दि. १० व ११ जुन २०२५ रोजी विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक ईश्वर नारायण वाघ निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा यांच्या नेतृत्वाखाली बुलढाणा शहरातील भीलवाडा,आंबेडकर नगर, कैकाळीपुरा या भागात अवैध हातभट्टीवर १२ वारस गुन्हे नोंदवुन १३३ लि हातभटटी व ३११४ लि रसायनासह एकुण १ लक्ष ६० हजार १७५ हजार रुपयांचा मुद्येमाल पकडण्यात आला. बोज्जावार निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भ. प. बुलढाणा यांनी भादोला, डोंगरखंडाळा या भागात अवैध मद्य विक्री ७ वारस गुन्हे नोंदवुन १३१ लि हातभट्टी व - ३३९२ लि रसायन व ४.३२ लि देशी व सह एकुण १ लक्ष ५६ हजार २८० रुपयांचा मुद्येमाल पकडण्यात आला.

व्ही एम. पाटील निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खामगाव यांनी मनसगाव,शेगाव, देवधाबा मलकापुर या भागात अवैध हातभट्टी व मद्यविक्री ८ वारस गुन्हे नोंदवुन १०७ लि हातभटटी व १८५१ लि रसायन व ११.९७ लि देशी व सह एकुण १ लक्ष ५६ हजार ८० रुपयांचा मुद्येमाल पकडण्यात आला.

रोकडे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चिखली व रोटे दु. नि. दे. राजा - १ व नयना देशमुख दु नि दे.राजा-२ व भगत यांनी चिखली, देउळगावराजा भागामध्ये अवैध मद्य विक्री ९ वारस गुन्हे नोंदवुन ६८.४० लि देशी व २५.९२ लि. विदेशी सह एकुण १ लक्ष २६ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल पकडण्यात आला.

पुढील काळात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडुन अवैध हातभट्टी केंद्रावर अशाच प्रकारे विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यामुळे आपल्या परीसरात अवैध मद्य विक्री अथवा बनावट निर्मीती आढळल्यास या विभागास टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ वर किंवा व्हॉटसअॅप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ कळवावे.

तसेच बुलढाणा जिल्हयातील किरकोळ व ठोक विक्री मद्य अनुज्ञप्तीधारक यांच्या अनुज्ञप्तीमध्ये जर बनावट मद्य आढळुन आले तर त्यांची अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल. मद्य बाळगतांना, मद्य सेवन, मद्य वाहतुक करतांना किंवा आपले जागेचा वापर अवैध धाबा चालवीण्यासाठी दिल्यास त्यावर महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत कठोर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

# माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांचे समर्थनार्थ प्रहारजनशक्तीचे टॉवरवर चढून आंदोलन



**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)** : प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष, बच्चूभाऊ कडू यांनी मोझरी येथे शेतकरी, सर्वसामान्य जनता, अपंग बांधवांच्या न्याय मागण्यांसाठी गत चार दिवसांपासून अन्नत्याग आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ मलकापूर तालुका व शहर प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जिल्हा उपप्रमुख अजय टप यांच्या नेतृत्वात आज ११ जून रोजी चक्क बीएसएनएल टॉवरवर चढून आंदोलन करीत शासन, प्रशासनाचे लक्ष वेधले. तर त्यानंतर तहसील कार्यालया समोर साखळी उपोषण सुरू केले आहे. बच्चूभाऊ कडू यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला समर्थन म्हणून प्रहारजनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी चक्क टॉवरवर चढून आंदोलन केले.

तहसीलदार राहुल तायडे यांनी आंदोलनस्थळी जात टॉवरवर चढलेल्या आंदोलकांशी भ्रमणध्वनीवरून चर्चा केली. तुमच्या मागण्यांबाबत योग्य तो विचार करून मागण्या शासनाकडे पाठविण्याचे आश्वासन दिले. यानंतर आंदोलकांनी खाली उतरून आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

सन २०२३ -२०२४ चा खरीप पिक विमा सरसकट शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करण्यात यावा, दिव्यांगांना व विधवा महिलांना दरमहा ६ हजार रूपये पगार देण्यात यावा, ७ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्त प्रमाणे शासन निर्णय काढण्यात यावे, लोकांच्या हाताला काम द्यावे नाहीतर सन्मानजनक दाम देण्यात यावे, रिक्त जागा तातडीने भरण्यात याव्यात व जास्त पदसंख्या त्या जाहिराती प्रसिध्द करण्यात याव्या, शहराप्रमाणे ग्रामीण भागाचा घरकुल करिता समान निकष लावून किमान ५ लाख रू. अनुदान घरकुल लाभार्थ्यांना देण्यात यावे, शेतकऱ्यांप्रमाणे शेतमजुराचा अपघाती मृत्यू झाल्यास आर्थिक सहाय्य देण्यात यावे, पेरणी व कापणीपर्यंत मजुरीची सर्व कामे एमएसपीमध्ये घेण्यात यावी यासह आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपप्रमुख अजय टप, तालुकाप्रमुख अजित फुंदे, शहर प्रमुख शालिग्राम पाटील, अजबराव वाघ, बळीराम बावस्कर, राहुल तायडे, दत्ता नारखेडे, आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदिवासी ग्राम शिवणी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर



**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)**:- शेतकरी व इतर नागरिकांना महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा. तसेच जनतेच्या समस्या व तक्रारी असतील त्याचा निपटारा करणे आदी २९ बाबींचा समावेश असलेले त्याचबरोबर महसूल विभागाचे कार्य लोकाभिमुख होण्याकरीता शासनाच्या आदेशानुसार आज ११ जून रोजी तालुक्यातील आदिवासी ग्राम शिवणी (दयालनगर) येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर संपन्न झाले.

ह्याप्रसंगी प्रमुख म्हणून माजी मंत्री तथा आ.डा. संजय कुटे , जळगाव (जा.) महसूल राजस्व विभागाचे उपविभागीय अधिकारी शैलेश काळे, संग्रामपूरचे तहसीलदार प्रशांत पाटील यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती होती.

यावेळी प्रथम मार्गदर्शक यांनी आदिवासी व इतर शेतकरी महिला यांना ह्या अभियान शिबिराचे महत्त्व पटवून दिले. व एकाच छताखाली सर्व विभाग शासन आपल्या दारी गावात आल्याचे सांगितले. याचा लाभ सर्वांनी घ्यावा. व शासनाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले. ह्या शिबिरात अनेक शेतकरी महिला ,पुरुषांच्या व ईतर नागरिकांच्या समस्या ,अडी अडचणी व तक्रारी समजून घेण्यात आल्यात. व जागेवरच काही शेतकरी नागरिकांना विविध दाखले देण्यात आले, तसेच महसूल मंडळ अधिकाऱ्यांनी तयार केलेला शासन डिजिटल सनदचे वितरण नागरिकांना आ.डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. त्याचप्रमाणे महिलांनी सक्षम बनावे त्यांना सुद्धा रोजगार मिळावा व एखादा उद्योग सुरू करावा. यासाठी शिवनी (दयालनगर) येथील महिला बचत गटाला १ लाख ५० हजार रु.चा धनादेश सुद्धा आ.डॉ. संजय कुटे यांच्या हस्ते महिला बचत गटाला प्रदान करण्यात आला. ह्या शिबिरासाठी विविध शासकीय योजनांचे लाभार्थी नागरिक ,महिला ,मंडळ अधिकारी ,ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आणि इतर कर्मचारी ,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

विशेष म्हणजे ह्या शिबिरात पं.स.अंतर्गत येणाऱ्या लाभार्थांना घरकुलाचा लाभ मिळावा व गोरगरिबांना घरकुल बांधकाम करून मिळावे. यासाठी नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले असता आमदार व वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर ग्रा.पं.च्या महिला सचिव ग्रामसेवक यांना उत्तर देता आले नाही.व समाधान करता आले नाही.

वास्तविक त्यांचे समाधान करण्यासाठी संग्रामपूर पं,चे गटविकास अधिकारी हे उपस्थित असणे आवश्यक होते. परंतु ते आजच्या शिबिराला उपस्थित नव्हते. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांची नाराजी व्यक्त केल्याचे समजते..

# सोन्याची अंगठी लंपास, दोघांविरुध्द गुन्हा दाखल

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - सेवानिवृत्त मुख्याध्यापकाची फसवणूक करून १२ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी लंपास केल्याची घटना ७ एप्रिल रोजी बुलढाणा शहरातील कारंजा चौकात घडली होती. या प्रकरणी शहर पोलिसांनी तांत्रिक व गुप्त माहितीच्या आधारे नाशिक जिल्ह्यातील येवला येथून दोन आरोपींना अटक करून सोन्याची अंगठी जप्त केली. चेतना नगर, सुंदरखेड येथील रहिवासी व सेवानिवृत्त मुख्याध्यापक बंडू चव्हाण (वय ७९) हे एका वैयक्तिक कामानिमित्त ७ एप्रिल रोजी कारंजा चौकात आले होते. एका स्वीटमार्टमध्ये गेले असताना त्यांना मध्यमवयीन एक व्यक्ती भेटला. त्याने भावनिक आवाहन करून त्याने चव्हाण यांना विश्वासात घेतले. त्याच्या सूचनेनुसार, चव्हाण यांनी हातातील सोन्याची अंगठी आणि खिशातील १०० रुपयांची नोट एका पांढऱ्या रुमालात ठेवली. त्या रुमालात गुंडाळून तो रुमाल पुढे घेऊन जाण्यास सांगत मागे वळून पाहू नका, असे बजावले. काही वेळाने शंका आल्याने चव्हाण यांनी रुमाल उघडून पाहिला असता, अंगठी गायब होती. या प्रकरणी पोलीस पथकाने नाशिक जिल्ह्यातील येवला येथे शोध मोहीम राबवली. आरोपी अमजद नवाब मदारी (वय ३७) आणि अंसार उस्मान मदारी (वय ३९) या दोघांना अटक करून त्यांच्याकडून १२ ग्रॅमची सोन्याची अंगठी जप्त केली आहे. आरोपींची कसून चौकशी करण्यात येत आहे.

# भरधाव टिप्परच्या दुर्घटनेतून वारकरी बचावले

**चिखली (महासागर प्रतिनिधी)** - इसरूळ मार्गावर देऊळगाव घुबे गावाजवळ १० जून रोजी सायंकाळी ६ ते ७ वाजेच्या सुमारास एक भीषण अपघात टळला. वाकी रायपूर, श्रीक्षेत्र पैठण ते श्री क्षेत्र पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या दिंडीच्या मार्गात भरधाव वेगात आलेल्या एका नंबर नसलेल्या टिप्परने अक्षरशः थरकाप उडवला. सुदैवाने चालकाने प्रसंगावधान राखत टिप्पर रस्त्याच्या बाजूला टाकल्याने दिंडीतील शेकडो वारकऱ्यांचे प्राण वाचले. या घटनेमुळे इसरूळ रस्त्याची धोकादायकता पुन्हा एकदा समोर आली असून, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पंढरपूरकडे विठ्ठल नामाच्या गजरात पायी निघालेली दिंडी देऊळगाव घुबे येथे मुक्कामासाठी जात होती. त्याचवेळी रेती भरण्यासाठी भरधाव वेगात निघालेल्या आणि नंबर नसलेल्या दोन टिप्पर चालकांमध्ये चढाओढ लागली होती. वेगाच्या नशेत असलेल्या या टिप्पर चालकांपैकी एकाला वेगावर नियंत्रण मिळवता आले नाही. समोर दिंडी पाहून त्याने प्रसंगावधान राखत आपले टिप्पर रस्त्याच्या विरुद्ध दिशेने खाली उतरवले. यामुळे टिप्पर थेट दिंडीत घुसण्यापासून वाचले आणि एक मोठी दुर्घटना टळली. वारकऱ्यांना कोणतीही इजा झाली नाही, मात्र या घटनेने दिंडीतील वारकरी आणि स्थानिक नागरिक भयभीत झाले होते. या मार्गावर रेतीच्या टिप्परची वाढती संख्या आणि त्यांचा बेदरकार वेग ही नित्याचीच बाब बनली आहे. अनेक टिप्परला नंबर प्लेटही नसतात त्यामुळे त्यांची ओळख पटवणेही अवघड होते. आजच्या घटनेने पुन्हा एकदा या रस्त्यावरील वाहतुकीची गंभीर परिस्थिती अधोरेखित झाली आहे. स्थानिकांनी वारंवार प्रशासनाकडे तक्रारी करूनही यावर कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. या प्रकारच्या घटनांमुळे सामान्य नागरिकांचा जीव धोक्यात येत असून प्रशासनाने तत्काळ यावर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. या घटनेची गंभीर दखल घेऊन बेफिकीरपणे वाहन चालवणाऱ्या टिप्पर चालकांवर आणि त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या मालकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# माजी सरपंचाचा कुजलेला मृतदेह सापडला!



लोणार तालुक्यात खळबळ

**सुलतानपूर (महासागर प्रतिनिधी)**: लोणार शहरात खळबळजनक बातमी समोर आली आहे. माजी सरपंचाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळला आहे. हा मृतदेह लोणार शहरातील हिरडव रोडवर आढळला. अशोक आबाजी सोनुने (६०, रा. वाढव, तालुका, लोणार) असे या मृताचे नाव आहे. अशोक सोनुने हे वढव गावाचे माजी सरपंच होते आणि १४ मे पासून होते बेपत्ता होते.

लोणार पोलीस ठाण्यात अशोक सोनुने यांच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, काल संध्याकाळी शहरातील हिरडव रोडवर एक कुजलेला आणि दुर्गंधीयुक्त मृतदेह आढळला. अशोक सोनुने असे या मृताचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच लोणार पोलीस घटनास्थळी पोहोचले. सूत्रांनी सांगितले की, मृतदेह अतिशय कुजलेल्या अवस्थेत होता. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाचा विविध दृष्टिकोनातून तपास सुरू केला आहे. काही लोकांना हा खून असल्याचा संशय असल्याने पोलिसांनी तपास अधिक तीव्र केला आहे.

गेल्या २५ दिवसांपासून अहवाल देऊनही पोलिस प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही. अखेर काल उशिरा त्याचा कुजलेला मृतदेह सापडला* पोलिस प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# दे.राजाचे विद्युत अभियंता प्रल्हाद मुंडे यांची गंगापूरला बदली



**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी)**- बालाजी नगरीचे नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी अरुण मोकळ यांच्या माध्यमातून देऊळगाव राजा शहराचा कोंडलेला श्वास मोकळा करून रस्ते पाणी नदी स्वच्छता नाले स्वच्छता स्ट्रीट लाईट असे अनेक कामे नगर परिषदेच्या माध्यमातून ना भूतो ना भविष्यात असे अनेक कामे अग्रेसर ठरलेले प्रशासक मोकळ यांचे शहरात ठीकठिकाणी नागरिक कौतुक करताना दिसत आहे.

त्यांच्या प्रशासनातील विद्युत अभियंता प्रल्हाद मुंडे यांनी नगरपालिकेच्या माध्यमातून शहरात विद्युत रोषणाई चिखली-जालना महामार्गावर स्टेट लाईटचे काम विद्युत दुरुस्त्या बरेच ठिकाणी नवीन कामे करण्यास अग्रेसर ठरलेले मुंडे यांचा सहा वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांची प्रशासकीय बदली छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील गंगापूर नगरपरिषदेला झाली त्यांच्या जागी विशाल सायबर हे गंगापूरहून देऊळगाव राजा नगरपरिषदेला रुजू झाले आहे मूळचे बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा तालुक्यातील जऊळका येथील रहिवासी असलेले मुंडे हे भारत मातेची सेवा करून विद्युत अभियंता या पदावर देऊळगाव राजा नगरपरिषदेला सहा वर्षाची सेवा देऊन संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूरला विद्युत अभियंता या पदावर रुजू झाले आहे.

# पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांचा जिल्हादौरा



**बुलढाणा (जिमाका)** - राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे ११ व १२ जून २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार बुधवार दि. ११ जून रोजी मुंबई येथून शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे सोईनुसार आगमन व राखीव. गुरुवार १२ जून रोजी दुपारी १ ते २ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह येथे अभ्यांगतांसाठी राखीव. सोईनुसार दुपारी बुलढाणा येथून खामगावकडे प्रयाण व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यक्रमास उपस्थिती. त्यानंतर सोईनुसार पुणेकडे रवाना होतील.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा खामगाव दौरा



**बुलढाणा (जिमाका)** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे गुरुवार, १२ जून रोजी खामगाव दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे : गुरुवार १२ जून रोजी दुपारी ४.४५ वाजता अकोला येथून शासकीय विश्रामगृह, खामगाव येथे आगमन व नागरिक, कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी राखीव. सायंकाळी ६ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान, खामगाव जि.बुलढाणा येथे आगमन व कार्यकर्ता मेळावास उपस्थिती. रात्री ८ वाजता देवजी खिमजी मंगल कार्यालय, खामगाव जि. बुलढाणा येथे आगमन व पत्रकार परिषदसाठी उपस्थिती. रात्री ८.४५ वाजता राखीव. त्यानंतर सोईनुसार शेगाव जि. बुलढाणाकडे प्रयाण व मुक्काम.

नियमित वाचा - महासागर
बातम्या व जाहिरातींसाठी संपर्क 9561361404

# मलकापूरात हिवताप जनजागरण मोहिम

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)** : येथील उपजिल्हा रुणालयाच्या वतीने हिवताप जनजागरण मोहिमेला सुरुवात करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे पावसाळ्यापूर्वी हिवताप, डेंग्यू, चिकन गुनिया, हत्तीरोग तसेच इतर कीटकजन्य आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गीते, जिल्हा हिवताप अधिकारी चव्हाण, सहाय्यक जिल्हा हिवताप अधिकारी पांडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जैन, वैद्यकीय अधीक्षक डॉ. उंबरकर, मापारी, आरोग्य निरीक्षक पाखरे यांच्या मार्गदर्शनाखाली मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात जनजागरण सभा पार पडली. सभेत आरोग्य निरीक्षक पाखरे यांनी हिवताप, डेंग्यू आजाराविषयी सविस्तर माहिती देऊन हिवताप कोणत्या डासांपासून होतो व डेंग्यू आजार कोणत्या डासांपासून होतो याबद्दल माहिती दिली. तसेच उपाययोजनेत आपल्या घराभोवतालचा परिसर स्वच्छ, अंगभर कपडे घालण्याबाबत, कोरडा दिवस पाळण्याबाबत, मच्छरदाणीचा वापर करण्या बाबत, दरवाजे, खिडक्या व गॅस पाइपला जाळी बसवण्या बाबत मार्गदर्शन केले.

# शेतकऱ्यांच्या वीज बिल माफीसाठी शिवसेनेचे बुलढाण्यात निदर्शने

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)**- : शेतकरी आणि शेती बाबतच्या धोरणावर राज्य शासनाची उदासीनता कायम आहे. महावितरणाने तर शेतकऱ्यांची थट्टा चालवली आहे. शहरी भागातही नागरिक वीज खोळंब्यामुळे त्रस्त असून विद्युत पुरवठा बाबतच्या समस्या गांभीर्याने घ्या, अन्यथा जिल्हाभर आंदोलन छेडण्याच्या इशारा उबाठा. शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी दिला आहे . शेतकऱ्यांचे वीज बिल माफ झालेच पाहिजे, या प्रमुख मागणीसह अन्य शेती हिताच्या मागण्यासंदर्भात जालिंदर बुधवत यांच्या नेतृत्वात महावितरण बुलढाणा येथील मुख्य कार्यालयासमोर मंगळवार १० जून रोजी निदर्शने करुन निवेदन देण्यात आले.

यावेळी महिला आघाडी जिल्हा प्रमुख चंदाताई बढे, युवा सेना जिल्हाप्रमुख नंदू कऱ्हाडे, जिल्हा समन्वयक संदीप शेळके, डी. एस. लहाने, सुनील घाटे, सुधाकर आघाव, लखन गाडेकर,विजुभाऊ इंगळे, विजय इतवारे, अशोक गव्हाणे, अॅड.सुमित सरदार, रवि राजपूत, गोविंद डांगर, गजानन उबरहंडे, सुनील गवते, समाधान बुधवत, अनिकेत गवळी, संजय शिंदे, संजय गवळी, भगवान नरोटे रंगनाथ नप्त, कृष्णा वाघ, मुजफ्फर शेख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान मेळाव्यात जात प्रमाणपत्राचे वाटप

## मेळाव्याच्या माध्यमातून जनतेची कामे तत्पर निकालात काढणार - तहसीलदार अजित दिवटे



**सिंदखेडराजा (महासागर प्रतिनिधी)**: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक लागणारे दाखले, निराधार महिलांच्या समस्या , शेत रस्त्याची प्रकरणे यासह अनेक कामे एकाच छताखाली तत्पर व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान मेळाव्याचे आयोजन केले आहे . या मेळाव्याच्या माध्यमातून जनतेची कामे तत्पर निकालात काढली जाणार आहे .

आजचा साखरखेर्डा येथील मेळावा हा पहिलाच मेळावा असल्याने काही प्रकरणे प्रलंबित राहतील , परंतू त्यावर लवकरच निर्णय घेतला जाईल असे आश्वासन तहसीलदार अजित दिवटे यांनी दिले. यावेळी सात बारा , जात प्रमाणपत्र , डोमासाईल , आधार कार्ड , आभाकार्ड यासह अनेक कागदपत्रे वाटप करण्यात आली. मेळाव्याला वैद्यकीय अधिकारी डॉ गोपाल परिहार यासह कृषी सहायक , आरोग्य सेवक, ई महसूल प्रणालीचे कर्मचारी , पुरवठा विभागाचे अधिकारी , निवडणूक शाखा कर्मचारी , रोहयो कर्मचारी , आरोग्य विभाग , ग्रामीण विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आज सर्वात जास्त प्रकरणे शेतरस्त्याची असून ज्या शेतकऱ्यांनी शेत रस्ता अडविला आहे त्यांनी लवकर शेतरस्ता मोकळा करून द्यावा अन्यथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या आदेशानुसार ज्यांनी शेत रस्ता अडविला त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात येईल असा इशारा तहसिलदार अजित दिवटे यांनी दिला .

आजच्या मेळाव्यात शेत रस्त्याची प्रकरणे अधिक असल्याने त्यांची प्रकरणे तहसीलदार यांनी दाखल करुन घेतली . कार्यक्रमाचे संचालन सचिन खंडारे यांनी केले .

महासागर
गुरूवार दि. १२ जून २०२५
# खामगाव
(बुलडाणा)
पान ६

## बुद्ध विहारातील दानपेटी लंपास, पोस्टे तक्रार



**खामगाव (का.प्र.) :** तालुक्यातील पिंपळगावराजा येथील शांति दूत बुद्ध विहारातील दानपेटी चोरट्यांनी लंपास केल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. शहरातील गुन्हेगारी वाढत असताना पोलिस प्रशासनावर पुन्हा एकदा कार्यक्षमतेचे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विहाराच्या मुख्य दरवाजाला बसवण्यात आलेली लोखंडी दानपेटी चोरट्यांनी लंपास केली. या प्रकरणी सती प्रल्हाद तेलंग यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यामध्ये विहारात आले असता त्यांना हा प्रकार निदर्शनास आला. शांतिदूत बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष वसंता तेलंग यांनी सांगितले की, मागील दोन तीन वर्षांपासून ही दानपेटी उघडलेली नव्हती, त्यामुळे त्यात मोठी रक्कम असण्याची शक्यता आहे.

## थोडक्यात

### प्रा.देवबा पाटील यांच्या 'खार'कवितेचा बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात समावेश



**खामगाव :** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने प्रा. देवबा पाटील यांच्या 'गंमत जंमत' ह्या बालकाव्यसंग्रहातील 'खार' ही कविता जून २०२५ पासून पहिल्या वर्गाच्या बालभारतीच्या पाठ्यपुस्तकामध्ये समाविष्ट केली आहे. जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक सत्रासाठी पहिल्या वर्गाच्या संपूर्ण महाराष्ट्रामधील सर्व प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या प्रशिक्षणामध्ये बालभारतीच्या पहिल्या वर्गाच्या पुस्तकाचे वितरण नुकतेच झाले आहे. त्यामध्ये ही कविता आहे. तसे म.रा. पाठ्यपुस्तक मंडळाचे पत्रसुद्धा पाटील सरांना प्राप्त झाले आहे. हीच कविता म.रा. पाठ्यपुस्तक मंडळाने जून २०१४ पासून मराठी शाळांच्या दुसऱ्या वर्गाच्या 'मजेत शिकूया मराठी' ह्या पाठ्यपुस्तकामध्ये सुद्धा समाविष्ट केलेली आहे व आजपर्यंत ती त्या अभ्यासक्रमामध्ये होती. खामगाव येथील गो. से.महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक देवबा शिवाजी पाटील यांच्या बालकवीतेचा बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात समावेश होणे ही संपूर्ण महाराष्ट्रात साहित्य क्षेत्रात सन्मानाची व प्रतिष्ठेची समजली जाणारी बाब आहे. हा बालकाव्यसंग्रह सुगम प्रकाशन, अमरावती यांनी २०१३ साली प्रकाशित केला आहे. त्यांच्या कवितेद्वारा त्यांना मिळालेल्या ह्या सन्मानाबद्दल गो. से.महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. दादासाहेब उर्फ डॉ. सुभाष बोबडे, उपाध्यक्ष मा. अशोकसेठ झुनझुनवाला, सचिव मा. प्रशांत बोबडे, प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर, उपप्राचार्य डॉ. प्रफुल्ल उबाळे, कॉलेजचे सर्व प्राध्यापकवृंद, कर्मचारी आणि खामगावच्या व महाराष्ट्रातील अनेक सुप्रसिद्ध साहित्यिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या सन्मानाबद्दल समाजाच्या सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे.

### पडीक घरात ६ गायी मृत्यूमुखी

**लोणार** – तालुक्यातील गंधारी येथील पडीक घरात ६ गाई मृत्यूमुखी पडल्याची घटना १० जून रोजी उघडीस आली. याबाबत बळीराम धमासिंग राठोड यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली की, ८ दिवसापूर्वी मोकाट सोडलेल्या ६ गाईंचा शोध घेतला असता आढळून आल्या नाही. ९ जून रोजी संध्याकाळी पडीक घरात दुर्गधी वास आल्याने जाऊन पहिले असता ६गाई मरण पावल्याच्या दिसून आल्या. एकाच ठिकाणी गाई मेल्याने चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच महसूल कर्मचारी, पोलीस कर्मचारी, डॉक्टरांनी घटनास्थळाला भेट दिली.

### नववधू ९० हजाराचे सोन्याचे दागिने घेवून पसार : पोस्टे तक्रार


**खामगाव** – महादेव बाळकृष्ण लांडे वय २५ वर्षे, रा. आवार याचे लग्न २५ मे रोजी वैष्णवी हरिदास सुरडकर वय १८ वर्षे, रा. पळसखेड ता.जळगाव जामोद येथे समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे पार पडले होते. महादेव बाळकृष्ण लांडे यांनी वैष्णवीला लग्नात भेट म्हणून ९० हजाराचे सोन्याचे दागिने दिले होते. सर्व कार्यक्रम आटपून पत्नी सौ वैष्णवी महादेव लांडे हिला आवार येथे आणले होते. मात्र वैष्णवी कोणाला काही न सांगता २ जून रोजी घरातून निघून गेली आहे. शोध घेऊनही ती मिळून आली नाही, अशी तक्रार पती महादेव लांडे यांनी खामगाव ग्रामीण पोलिसात दिली आहे.

### खरीपाच्या पेरणीसाठी शेतीच्या कामांना वेग

**खामगाव** – : रब्बी हंगाम संपला आणि शेतकऱ्यांच्या खरीप हंगामाला सुरुवात झाली. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे या परिसरातील कापूस व सोयाबीन सहित सर्व खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. त्या संकटातून सावरत शेतकरी बंधूंनी यंदाचे वर्ष चांगले जाईल या आशेने खरीप पेरणीपूर्व शेतमशागतीच्या कामाला सुरुवात केली. मे महिन्यात शेतकरी आपल्या शेतात काडीकचरा वेचून शेत स्वच्छ करणे, धुरे बंधारे साफ करणे त्यानंतर नांगरणी व वखरणी करून पेरणीसाठी शेत तयार कऊश्न ठेवतात परंतु मे महिन्यात बऱ्याच वेळा पाऊस आल्यामुळे शेतकऱ्यांची ही कामे खोळंबली होती. एकीकडे लगीन घाई तर दुसरीकडे शेतीची मशागत यामुळे शेतकऱ्यांची तारांबळ उडाली होती. तरी शेतकऱ्यांनी शेतीची बाह्य मशागत केली आहे. या परिसरात कापूस, सोयाबीन, मका तसेच तूर ही महत्त्वाची खरीप पिके घेतली जातात. सिंचनाची सोय असलेले शेतकरी मे महिन्याच्या शेवटी किंवा जूनच्या सुरुवातीलाच कपाशीची लागवड करीत असतात. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी कपाशी सह मक्याचीही पेरणी केली आहे. त्यापैकी काही शेतकऱ्यांची कपाशीची पिके शेतात डोलत आहे त्यामुळे या शेतात शेतकरी बंधू कपाशीला खत देणे तसेच कोळपणी करण्यासाठी कामे करीत आहे तर काही शेतकऱ्यांची अजूनही बाह्य मशागत सुऊश? आहे. कपाशीचे पीक जास्त दिवसाचे असून मागील चार-पाच वर्षांपासून कपाशी पिकाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्यांना हे पीक परवडत नसल्यामुळे मागील दोन-तीन वर्षापासून या परिसरात यामुख्य पिकाचा पेरा फार कमी झाल्याचे दिसत आहे. त्यामानाने मका या पिकाला शेतकरी पहिली पसंती देत आहे यावर्षी शेतकऱ्यांना कोणतीही नैसर्गिक आपत्ती न येता पीक उत्पादन चांगली यावे याच आशेने या परिसरातील शेतकरी कुठे तयारी तर कुठे खरीप हंगामाची मशागत करीत असताना दिसत आहे.

# सर्वर डाऊन मुळे सेतू चालकांची डोकेदुखी वाढली

## विद्यार्थी व नागरिक त्रस्त



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी) :** जळगाव जामोद तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात दिनांक २ जुन २०२५ पासुन सर्वर मध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने कोणतेच दाखले वेळेवर विद्यार्थी व नागरिकांना मिळणे कठीण झाले असून यामुळे सेतू केंद्रावर संचालक व ग्राहकांमध्ये हमरी-तुमरी होत आहे. या सर्व डाऊन च्या प्रॉब्लेम मुळे उत्पन्न दाखला, नॉन क्रिमिलियर, जातीचे दाखले, अधिवास प्रमाणपत्र उशिरा मिळत असल्याने विद्यार्थ्यांसह नागरिकांची मोठी डोकीदुखी वाढत आहे तसेच शाळा महाविद्यालय प्रशासनाने सुद्धा दाखल्यांकरिता विद्यार्थ्यांच्या पाठीमागे तगादा लावत असल्याने विद्यार्थी व पालक त्रस्त झाले आहेत. यातच शासनाने दिनांक २४ एप्रिल २०२५ पासून दाखल्यासाठी लागणाऱ्या खर्चामध्ये दाम दुप्पट वाढ केली असुन वाढ केल्याचे कोणतेही परिपत्रक व माहिती केंद्र चालकांना दिली नाही या सर्व महा-ई-सेवा केंद्र चालकांना दरवाढ केल्याची माहिती देणे न दिल्याने काही सेतू चालकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला.

दरवाढीमध्ये उत्पन्न प्रमाणपत्र तसेच प्रतिज्ञा लेख,अधिवास या करिता अगोदर ३३ रुपये ६० पैसे तर आता नवीन दरवाढ केल्याने ६९ रुपये प्रमाणपत्र पडत आहे.तसेच अगोदर जातीचे दाखले व नॉन क्रिमिलियर करिता ५८ रूपये ६० पैसे लागत होते तर दरवाढीमुळे १२८ रूपये लागत आहेत.. या दरवाढीमुळे सुद्धा नागरिकांमध्ये सरकार विषयी रोष पाहायला मिळत आहे.सर्वर डाऊनमुळे व तहसीलदार सुट्टीवर गेल्यामुळे जळगाव जामोद येथील एका सेतू केंद्रामध्ये जवळपास ५०० ते ६०० अर्ज थांबले असुन यामुळे नागरिक व विद्यार्थी सेतु सुविधा केंद्रात चकरा मारुन मारुन थकले आहेत.तहसिलदार पवन पाटील हे रजेवर गेल्याने तसेच येथील नायब तहसीलदारांच्या बदल्या झाल्याने तहसील विभागाचा कारभार सध्या वाऱ्यावर सुरु आहे.

## अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त सराव वर्गाचे उद्घाटन



**शेगाव (महासागर प्रतिनिधी) :** १० जून रोजी जिल्हा योग परिवाराच्या वतीने २१ जूनला अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यासाठी सराव वर्गाचे उद्घाटन प्रल्हाद सुलताने प्रांत सहकोषाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली, निळकंठ साबळे राज्य प्रभारी पतंजलि किसान सेवा समिती यांच्या हस्ते व चतुर्भुज मिटकरी जिल्हा प्रभारी भारत स्वाभिमान, हरिदासजी सोळंके जिल्हा प्रभारी युवा भारत, विनायकजी भारंबे जिल्हा प्रभारी सोशल मीडिया, विलासजी डेहनकर योगशिक्षक व दिलीपजी गोहेल योगशिक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सभेमध्ये विनायक भारंबे, नीलकंठ साबळे हरिदास सोळंके, चतुर्भुज मिटकरी यांची योग दिवसाच्या महत्त्व सांगणारी भाषणे झाली.

प्रल्हाद सुलताने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात योग दिवस साजरा करण्यात सहभागी होत असलेल्या संस्था पतंजलि योग परिवार, गायत्री परिवार, आर्ट ऑफ लिविंग, आत्मज्योती योगा अँड फिटनेस, कस्तुराबाई फाउंडेशन ,जायंट्स ग्रुप जायंट्स सहेली, विविध संस्था निर्भया फाउंडेशन सहभागी होणार असल्याचे सांगितले तरी या कार्यक्रमासाठी २१ जूनला सकाळी मथुरा लॉन्स वर हजर राहण्याचे आव्हान केले. आत्मज्योती योगा अँड फिटनेस च्या संचालिका सौ ज्योतीताई लांबे यांनी प्रास्ताविक केले.सूत्रसंचालन वनश्री पुरस्कार प्राप्त विठ्ठलराव मिरगे यांनी केले चतुर्भुजजी मिटकरी व ज्योतीताई लांबे यांनी उपस्थितांना प्रोटोकॉलचा सराव दिला.

## बाल कामगार प्रथा विरोधी जनजागृती अभियान; विविध कार्यक्रमाचे आयोजन

**बुलडाणा, (जिमाका) :** जागतिक बालकामगार विरोधी दिन १२ जुन रोजी संपूर्ण जगात पाळला जातो. हा दिवस २००२ पासून पाळण्यात येत असून या दिनाचे औचित्य साधून सरकारी कामगार अधिकारी म.तु. जाधव यांच्याद्वारे बाल कामगार प्रथा विरोधी जनजागृती अभियान व सप्ताह जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने जिल्ह्यामध्ये विविध व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकांचे आयोजन करुन त्यामध्ये जिल्ह्यातील दुकाने, हॉटेल, व्यापारी संस्था व इतर सर्व आस्थापनांच्या व्यापारी बंधुना बालकामगार या अनिष्ट प्रथेविरुध्द माहिती देवून तसेच त्यांना बाल मजुरी निर्मुलनाचे महत्व समजावुन सांगण्यात येवुन जनजागृती करण्यात येणार आहे.

आमच्याकडे बालकामगार काम करीत नाहीत व यापुढेही बालकामगार ठेवणार नाही, असे हमीपत्र व्यापारी वर्गाकडून भरुन घेण्यात येईल. कोणत्याही आस्थापनेने १८ वर्षाखालील बालक किंवा किशोरवयीन बालकास आपल्या आस्थापनेवर कामास ठेवू नये, ठेवल्यास सदर आस्थापनेवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

लहान वयात काम केल्यामुळे बालकांच्या त्वचा, श्वसनमार्ग संस्था, मेंदु, जठर संस्था यावर विपरीत परीणाम होतो. त्यांची मानसिक, शारीरीक व बौध्दीक वाढ खुंटते. चांगले जीवन जगण्याचा त्यांना अधिकार आहे, तो आपण सर्वांच्या प्रयत्नाने व मदतीने त्यांना मिळाला पाहीजे. या निमित्ताने बालमजुरी मुक्त महाराष्ट्र या मोहिमेमध्ये सुध्दा जागरुक नागरीक म्हणुन सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी म.तु. जाधव यांनी केले आहे.

## अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे समाजातील विजेते स्पर्धकांचा गुणगौरव



**मलकापूर (महासागर प्रतिनिधी) :** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे समाजातील विविध अभ्यासक्रमातून यश संपादित विद्यार्थी तथा भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धांमधील विजेते स्पर्धकांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन ९ जून रोजी ब्राह्मण सभा येथे करण्यात आले होते.

आयोजित सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गौरीशंकर शिक्षण सेवा समितीचे अध्यक्ष तथा उद्योजक श्री मोरेश महाजन हे होते तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अमृत योजनेचे अमरावती विभागीय उपव्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर हे लाभले. याप्रसंगी यश संपादित तथा गुणवंत विद्यार्थ्यांना सद्य परिस्थितीत आवश्यक वृक्षरोप भेट देऊन वृक्षारोपण करण्याकरिता प्रोत्साहित करण्यात आले. तसेच त्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा अशा उदात्त हेतूने अकोला येथील जिल्हा क्रीडा मार्गदर्शक सूरजकुमार दुबे यांच्यातर्फे विविध पुस्तके उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांना पुस्तके भेट स्वरूपात देण्यात आली. त्याचबरोबर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना भविष्यातील प्रगती साधता यावी याकरिता मार्गदर्शक श्री.प्रवीण कोळेश्वर यांनी विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजना, विशेषतःअमृत योजने संदर्भात माहिती सांगितली.

याप्रसंगी यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये स्टेट बोर्ड इयत्ता दहावी मधून प्रथमेश कुलकर्णी, श्रावणी जोशी, वेदांत कुलकर्णी, सीबीएससी बोर्ड मधून अमेय कुलकर्णी, ओम घिर्णीकर, अनुष्का देशपांडे, धनश्री शर्मा, अंतरा कुलकर्णी, तर इयत्ता बारावी मधून नभा महाजन स्टेट बोर्ड बारावी मधून भार्गवी पानट, मानसी चिमनपुरे, ईशा कुलकर्णी, यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातून बीएएमएस मधून डॉ. सोनाली देशपांडे, डॉ. सुवर्णा जोशी, एमबीए मध्ये जया बीस्सा, सायली सकळकळे बीटेक मध्ये स्वानंद महाजन अशा यश संपादित विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, पुस्तक तथा एक वृक्षरोप भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्यात भगवान परशुराम जयंती निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध महिलांच्या तसेच पुरुषांच्या मैदानी स्पर्धांचे पारितोषकांचे सुद्धा वितरण करण्यात आले. क्रिकेटच्या स्पर्धेमधून ''परशुराम वॉरियर्स'' यांना विजेते तर ''परशुराम कॅपिटल'' हे उपविजेते ठरले होते. विजेत्या संघाला टूर्नामेंट ट्रॉफी सोबतच २१०० रुपयांचे रोख बक्षीस तर उपविजेता संघाला २१०० रुपयाचे बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.अमोल निंबोळे तर संचलन श्री.धीरज वैष्णव, आभार श्री.दत्तात्रय निमगावकर सर यांनी केले. आयोजित सोहळ्याला समाजातील महिला व पुरुष बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच कार्यक्रम यशस्वी पार पाडण्याकरिता अखिल भारतीय ब्राह्मण संघाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले.

### आयडीए तर्फे पर्यावरण दिन साजरा

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** – स्थानिक क्षय आरोग्यधाम येथे ५ जून पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. दरवर्षी झाडे लावा, झाडे जगवा, वृक्षारोपण इत्यादी माध्यमातून आयडीएकडून कार्यक्रम घेतले असतात. यावर्षी सुद्धा आयडीए बुलढाणातर्फे ५ जून पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला डॉ.राजू जतकर, डॉ. संजय गवळी डॉ. धनंजय भुसारी, डॉ. सचिन किनगे, डॉ. खासबागे, डॉ.सुमित दर्डा इत्यादींनी सहभाग घेतला.

## खामगाव तालुक्यात दोन आत्महत्या

**खामगाव (का.प्र.)-** : दोन वेगवेगळ्या गावांमध्ये झालेल्या अत्महत्येच्या घटनांमध्ये दोघांनी गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली. या घटनांबाबत प्राप्त माहिती अशी की तालुक्यातील जळका भंडक येथील रोहित अमर पाटोदे नामक १६ वर्षीय युवकाने १० जून रोजी दुपारच्या सुमारास शेतातील झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना गावातील काही लोकांच्या लक्षात आली. याबाबतची माहिती पिंपळगावराजा पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी येवून पंचनामा करुन मृतकाचे शव ताब्यात घेतले आणि त्याचे शव विच्छेदनासाठी येथील शासकीय सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. याप्रकरणी पिं.राजा पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे. दुसऱ्या 'घटनेत पिंप्री गवळी येथील शेतकरीपुत्र कैलास महादेव हरमकार (२३) याने ११ जून रोजी गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना उघडकीस आली. मृतकाचे शव विच्छेदनासाठी येथील शासकीय सामान्य रुग्णालयात आणण्यात आले आहे. हे वृत्त लिहेपर्यंत याप्रकरणी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला नव्हता.

## प.पू. आगाशे काका माऊली यांचा शुक्रवारी समाधी वर्धापन दिन

**खामगाव (का.प्र.)-** :प. पू. श्री आगाशे काका माऊली यांच्या १६व्या समाधी वर्धापन दिनानिमीत्य श्री क्षेत्र बरसाना (अमृत नगर) येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १५ जून २५ रोजी दुपारी २ वाजता श्री क्षेत्र बरसाना येथुन पालखी निघणार आहे. ही पालखी जलंब नाका, नांदुरा रोड, महात्मा गांधी उद्यान, शहर पोस्टे, महावीर चौक, फरशी, खामगाव अर्बन बँक, एकबोटे चौक, टॉवर चौक, सकळकळे कॉम्पलेक्स, देशमुख प्लॉट, सिव्हिल लाईन, केला पोस्ट ऑफिस, राम मंदिर, शाळा नं. ९, जलंब नाका अशी मार्गक्रमण करीत श्री क्षेत्र बरसाना येथे पोहोचणार आहे. या ठिकाणी पालखीचा समारोप होणार आहे. १६ जून २५ रोजी सकाळी ७ वाजता पवमान अभिषेक, सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत श्री कृष्णदास काका माऊली चरित्रामृत पोथीचे एक दिवशीय पारायण, सकाळी १०.३० ते ११.३० नामधून व नैवेद्य आरती, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद वितरण, सायंकाळी ५.३० वाजता करूणा त्रिपदी व रात्री ७.३० ते ९.३० वाजेपर्यंत भजन कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमांचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प. पू. श्री. कृष्णदास काका माऊली समाधी सेवा मंडळ बरसाना (अमृत नगर) यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

## पोलिसांचा जुगारावर छापा, ६ जुगारी पकडले



**खामगाव (का.प्र.)** – अमडापुर पोलिसांनी जुगारावर छापा टाकून जुगार खेळणाऱ्या ६ जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून नगदी, एक तास पत्ता, जुने ३ मोबाईल असा १९ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई ७ जून रोजी सायंकाळच्या सुमारास अमडापुर पोलिसांनी केली आहे.

किन्ही सवडत शिवारात सुरू असलेल्या जुगारावर अमडापुर पोलिसांनी उपरोक्त वेळी छापा टाकून नंदकिशोर उद्धव विघ्ने वय ३६ वर्ष, दिनेश ओंकार काळे वय ३४ वर्ष ,दीपक जयंत मानवतकर वय ३४ वर्ष, प्रदीप रामदास गवारगुरु वय ४२ वर्ष सर्व रा.चिंचपूर ता. खामगाव,शेख इस्ताक शेख मुख्तार वय ३७ वर्ष रा. पिंपरी कोरडे ता. खामगाव विठ्ठल रतन राठोड वय ४५ वर्ष रा. मोहदरी ता. चिखली यांचे विरुद्ध कारवाई करण्यात येवून नगदी ७ हजार रुपये, एक तास पत्ता, जुने ३ मोबाईल असा एकूण १९ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणाची फिर्याद अमडापूर पोस्टेचे पो.कॉ. प्रदीप चोपडे यांनी लेखी तक्रार दिल्यावरुन उपरोक्त आरोपीविरुद्ध अमडापुर पोस्टेला कायमी अप. नं. १६७/२०२५ कलम १२(अ) मजुका प्रमाणे कारवाई करण्यात आली असून पुढील तपास अमडापुर ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली वंदनाताई बोर्डे करीत आहेत.

नियमित वाचा
महासागर


### जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश
क.स्तर कार्ट क्र.२ नांदुरा, जि.बुलडाणा
अर्जदारांतर्फे ॲडव्होकेट -
ॲड.पवन जी परवाल
एम. जे. सी. नं. १३८ /२०२५
एफ.एफ.१६/०७/२०२५

अर्जदार :- १) संतोष प्रल्हाद बाठे, वय अं. ४८ वर्षे, धंदा- शेती, रा.मोमीनाबाद, ता. नांदुरा जि.बुलढाणा, २) प्रतिभा प्रमोद पाटील वय अं. ४९ वर्षे, धंदा - घरकाम रा. पुरोहीत कॉलनी, वार्ड नं. १०, मलकापुर जि. बुलढाणा ३) श्रध्दा नंदकिशोर वाघे वय अं. ४२ वर्षे, धंदा घरकाम रा. सारोला तह. नेपानगर बऱ्हाणपुर मध्यप्रदेश ४५०३३१

-विरूध्द -गैरअर्जदार- कोणीही नाही

मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफिकेट (वारस हक्काचे प्रमाणपत्र) मिळणेबाबत. हया जाहिर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, मयत प्रल्हाद मुकुंदा बाठे हे दि. ०४/०८/२०१२ रोजी मौजे मोमीनाबाद येथे मयत झाले तर सुशिलाबाई प्रल्हाद बाठे ह्या दि. ०६/१२/२०१४ रोजी मौजे मोमीनाबाद येथे मयत झाल्या असून वर नमुद अर्जदार हयांना मयत प्रल्हाद मुकुंदा बाठे व सुशिलाबाई प्रल्हाद बाठे हयांचे मृत्युनंतर त्यांना अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वर्ग १ चे वारस असल्याबाबतचा वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदारांना वारसा हक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी हया न्यायालयात अर्ज केला आहे व त्या अर्जाची सुनावणी दि. १६-७-२५ रोजी १०.३० वाजता होईल. तरी या जाहीर नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, सदर प्रकरणी ज्यांना काही हरकती, आक्षेप घ्यावयाचे असतील त्यांनी वरील तारखेस किंवा सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासुन ३० दिवसांचे आंत वि न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहू त्यांचे आक्षेप, हरकती सादर कराव्यात. अन्यथा कोणाचीही काहीही आक्षेप, हरकत नाही असे समजुन अर्जदार हयांना अर्जदार यांचे नांवे वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ११/४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- नांदुरा
दि. ११/४/२०२५

शिक्का

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
नांदुरा, जि.बुलढाणा


RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव(बुलढाणा)

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलडाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

